**वि.दि.दा.क्र.१०९/२०२३ मधील निशाणी क्र.२०८ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रं.१ ते १० यांचेतर्फे नि.क्रं.२०६ वरील रद्द केलेला आदेश रद्द करुन मिळणेकरीता दाखल केला आहे.

२) अर्ज व वादीचे म्हणणे याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

३) प्रतिवादी क्रं.१ ते १० यांचे असे कथन आहे की, नि.क्रं.२०६ वरील आदेशानुसार रक्कम रुपये ३०००/- भरणेकरीता प्रकरण प्रलंबीत होते. परंतु सदर रक्कम मुदतीत प्रतिवादींकडुन जमा न झाल्याने विलंब झाला आहे. सदर रक्कम प्रतिवादी आजरोजी भरण्यास तयार आहेत. परंतु, पुर्वीच सदर आदेश रद्द करण्यात आला असल्याने तो रद्द करण्याचा आदेश रद्द करुन मिळणे आवश्यक आहे. प्रतिवादींनी जाणुनबुजून रक्कम भरण्यास विलंब केलेला नाही. त्यामुळे, त्यांनी अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज मंजुर करणेत यावा.

४) वादीचे असे कथन आहे की, सदर अर्जात कायदयातील कोणत्या तरतुदीनुसार प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे हे नमुद केलेले नाही. वादीने दि.३१.०८.२०१८ रोजी सरतपास दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्रं.१ ते ९ यांचेतर्फे दि.१३.१२.२०१९ रोजी उलटतपास पुर्ण झालेला आहे. प्रतिवादी क्रं.१० यांनी उलटतपासास सुरु करुन दि.२३.०९.२०२२ रोजी उलटतपास तहकुब करुन घेतला आहे. सदर उलटतपास वारंवार तहकुब झाला आहे. प्रतिवादी क्रं.१ ते १० यांना उलटतपास घेण्याचा परवानगीचा अर्ज दि.१०.०१.२०२५ रोजी खर्चाची रक्कम रुपये ३,०००/- वर मंजुर केलेला आहे. सदर खर्चाची रक्कम प्रतिवादींनी सहा महिने भरली नसल्याने मागील तारखेस सदर आदेश रद्द करणेत आला. सदर अर्जात प्रतिवादींची मागणी मंजुर करण्याबाबत कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही.

त्यामुळे, त्याने अशी विनंती केली की, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५) दाव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादींनी उलटतपास नाहीचा आदेश रद्द करणेकरीता दि.२४.०९.२०२४ रोजी अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज दि.१०.०१.२०२५ रोजी खर्चाची रक्कम रुपये ३,०००/- देण्याच्या अटीवर मंजुर करणेत आला होता. सदर रक्कम भरणेकरीता प्रकरण दि.१४.०२.२०२५, दि.२१.०३.२०२५ व दि.०८.०४.२०२५ रोजी ठेवण्यात आले होते. परंतु, प्रतिवादींनी सदर खर्चाच्या रकमेची पुर्तता केली नाही. त्यानंतर दि.१०.०६.२०२५ रोजी नि.क्रं.२०६ वरील आदेश रद्द करणेबाबत आदेश पारीत करणेत आला. त्याचदिवशी प्रतिवादींच्या विद्वान विधिज्ञांनी सदर आदेश रद्द करुन मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जासोबतचे प्रतिज्ञापत्र प्रतिवादींनी दि.१३.०६.२०२५ रोजी दाखल केले आहे. प्रतिवादींच्या विद्वान विधिज्ञांचा असा युक्तीवाद आहे की, प्रतिवादी हे शेती करीत असल्याने त्यांना खर्चाची रक्कम जमा करण्यास विलंब झालेला आहे. परंतु, सदरचे प्रकरण हे सन २०१३ मधील असताना देखील प्रतिवादींची वर्तणुक ही केवळ दाव्यात विलंब करण्याची असल्याचे दिसुन येते. त्यामुळे, सदर युक्तीवाद ग्राहय धरता येणार नाही असे मला वाटते. असे असताना देखील प्रतिवादींना एक संधी देणे आवश्यक आहे असे दिसुन येते अन्यथा त्यांच्यावर अन्याय झाल्यासारखे होईल. सदरचा आदेश रद्द करण्याकरीता प्रतिवादींवर अतिरीक्त खर्चाची रक्कम लादने प्रस्तुत प्रकरणात क्रमप्राप्त आहे. त्यामुळे, सदरचा अर्ज खर्चासह मंजुर होणेस पात्र आहे असे मला वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे -

## <u>आदेश</u>

(१) अर्ज (नि.२०८) मंजुर करण्यात येतो.

(२) प्रतिवादी क्रं.१ ते १० यांनी खर्चाची रक्कम रुपये १,०००/- (रक्कम रुपये एक हजार फक्त) वादींना दयावी.

(३) वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर प्रतिवादी क्रं.१ ते १० यांचेविरुद्ध नि.२०६ वरील आदेश रद्द करण्याचा हुकूम रद्द करण्यात येईल.

(४) प्रतिवादी क्रं.१ ते १० यांनी सदर आदेशाची पुर्तता तात्काळ करावी.

स्थळ : वाई.
दिनांक : १३.०६.२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
वाई.